## लातूर शहर महानगरपालिका, लातूर

### स्थायी समिति सभा दिनांक 11.07.2019

विषय क्रं. 2 ठराव क्रं. 109

---

महानगरपालिका हद्दीमध्ये मनपा मालकीच्या जागेवर, खाजगी जागेवर / इमारतींवर कायम स्वरूपी व तात्पुरत्या लावण्यात येणा-या जाहिराती / होर्डींग्ज जाहिरात कर दरामध्ये वाढ करणे बाबत विचारविनिमय करून निर्णय घेणे.

**प्रस्तावः-** लातूर शहर महानगरपालिका लातूर सर्वसाधारण सभा दिनांक - 20/09/2012 ठराव क्रं. 17 अन्वये मनपा व शासकीय जागेवर 50/- रू प्रति चौ. मी. व खाजगी जागेवर 15/- रू प्रति चौ. मी. असे दर निश्चित करण्यात आले होते. परंतू सदर दर अतिशय कमी असल्याने नवीन जाहिरात धोरण करणे आवश्यक आहे.

सद्यस्थितित मनपाचे जाहिरात धोरण अस्तित्वात नसून ते बनविणे आवश्यक आहे. जाहिरातीचे दृष्टीने मनपाचे मुख्य रस्ते, खुल्या जागा व इमारती यांचे सर्वेक्षण करून जाहिरातींचे ठिकाणे निश्चित करणे आवश्यक आहे. जाहिरातीचे दर ठरवितांना मनपा व खाजगी जागांवरील जाहिरात कराचे दर सारखेच ठेवल्यास मनपाचे जागेवर देखील चांगला प्रतिसाद मिळेल, जाहिरात कराचे दर निश्चित करताना मनपा, खाजगी व शासकीय जागा असे दर निश्चित करणे योग्य राहिल. खालीलप्रमाणे जाहिरात कराचे दराचे धोरण निश्चित करण्यात आले आहे.

जाहिरात परवानगी शुल्क

| अ.क्रं. | जाहिरातीचा प्रकार | | जाहिरात परवानगी शुल्क प्रती चौरस फुट करीता. |
|---|---|---|---|
| 1. | जाहिरात फलक, कापडी फलक (तात्पुरते स्वरूपातील) | | रु. 15/- प्रति दिवस |
| 2. | विद्युत खांबावरील किऑक्स | | रु. 10/- प्रति महा |
| 3. | डिजीटल एल ई डी वॉल | महानगरपालिका जागेवरील | रु. 30/- प्रति महा |
| | | खाजगी जागेवरील | रु. 15/- प्रति महा |
| 4. | होर्डींग्ज | महानगरपालिका जागेवरील - | |
| | | 1) रोषनाई नसलेले जाहिरात फलक | रु.5/- प्रति महा+जागा भाडे रू.500/- प्रति महा |
| | | 2) रोषनाई असलेले जाहिरात फलक | रु.10/- प्रति महा+जागा भाडे रू.1000/- प्रति महा |
| | | खाजगी जागेवरील / इमारतीवरील | |
| | | 1) रोषनाई नसलेले जाहिरात फलक | रु. 5/- प्रति महा |

| | | |
|---|---|---|
| | 2) रोषनाई असलेले जाहिरात फलक | रु. 10/- प्रति महा |
| 5. | गॅंट्री (मुख्य रस्त्यावरील लोखंडी प्रवेशद्वार) | रु. 15/- प्रति महा |
| 6. | दुकानावरील जाहिरातीचे फलक<br>1) रोषनाई नसलेले जाहिरात फलक<br>2) रोषनाई असलेले जाहिरात फलक | <br>रु. 5/- प्रति महा<br>रु. 10/- प्रति महा |
| 7. | रोड शो-<br>1) फिरते वाहन<br>2) फिरते ऑटो / सायकल रिक्षा<br>3) आकाशातील प्रदर्शन (बलुन) | <br>रु. 500/- प्रति दिवस<br>रु. 300/- प्रति दिवस<br>रु. 300/- प्रति दिवस |

खालील अटी व शर्ती लागू करणे योग्य राहील.

1. शासकीय योजनांचे प्रचार/ प्रसार, आणीबाणी काळामध्ये व निवडणुक काळामध्ये जाहिरात एजन्सीचे जाहिरात काढुन घेण्याचे तसेच त्या जाहिरात फलकांवर जाहिरात लावण्याचे अधिकार मा. आयुक्त यांना असतील.
2. जाहिरात लावण्यासाठी 03 वर्षा करिता खाजगी जागेवर लावण्यासाठी परवानगी देण्यात येईल.
3. महानगरपालिकेचे आर्थिक उत्पन्नात वाढ होण्याच्यादृष्टीने ज्या इमारतीवर जाहिरात फलक (होर्डीग) उभारणे आहे. त्याचे बांधकाम परवानगी / भोगवटा प्रमाणपत्राच्या अटीमध्ये शिथीलता देऊन संबंधीत एजन्सी धारकाकडून जबाबदारीसंबंधीचे शपथपत्र घेवुन परवानगी देणेस मान्यता देण्यात येईल.
4. जाहिरात खाजगी जागेवर लावायची असल्यास संबंधीत खाजगी जागा इमारतीचे Stability certificate तसेच संबंधीत इमारत धारकांचे शपथपत्र देणे बंधनकारक आहे.
5. खाजगी जागेवर कोणतीही अनामत रक्कम आकारता येणार नाही, ही आकारू नये तसेच मनपाच्या जागेवर अनामत रक्कम आकारण्यात येईल.
6. वरील जाहिरातीचे दर, हे दर दोन वर्षाला 10% वाढ करण्यात येईल.
7. मनपाच्या जागेवर जाहिराती बाबत परवानगीचे नियम व अटी निश्चित करून परवानगी देण्यास मा. आयुक्त, लाशमनपा लातूर यांना अधिकार राहतील.

तरी वरीलप्रमाणे जाहिरात धोरण निश्चित करण्यात आल्यास लातूर शहर महानगरपालिकेच्या आर्थिक उत्पन्नात वाढ होणार आहे.

तरी उपरोक्त प्रमाणे विषयांकित प्रकरणा बाबत विषय मा. स्थायी समिती सभेपुढे निर्णयास्तव सविनय सादर.

सुचक:- श्री. जाधव रविशंकर दत्तोबा

अनुमोदक:- श्री. कांबळे कैलास व्यंकटराव

**निर्णय:-** महानगरपालिका हद्दीमध्ये मनपा मालकीच्या जागेवर, खाजगी जागेवर / इमारतींवर कायम स्वरुपी व तात्पुरत्या स्वरुपात लावण्यात येणा-या जाहीराती/ होर्डींगचे दर रकामना क्रं.4 मध्ये नमूद केल्याप्रमाणे लागू करण्यास ही स्थायी समिती मान्यता प्रदान करीत आहे. स्थायी समितीने मंजूर केलेल्या दरात दर तीन वर्षाला 5 टक्के दरवाढ करावी.

| अ.क्रं. | जाहिरातीचा प्रकार | | जाहिरात परवानगी शुल्क प्रती चौरस फुट करीता. | स्थायी समितीने मंजूर केलेले दर |
|---|---|---|---|---|
| 1 | 2 | | 3 | 1.13 4 |
| 1. | जाहिरात फलक, कापडी फलक (तात्पुरते स्वरूपातील) | | रु. 15/- प्रति दिवस | 3.13 प्रति चौं. फुट 10 फुटापर्यंत 10 फुटापेक्षा जास्त पण 20 फुटपेक्षा कमी असेल तर 6.25 प्रति चौं. फुट |
| 2. | विद्युत खांबावरील किऑस्क | | रु. 10/- प्रति महा | 12.50 प्रति महा प्रति बाजू साईज 36 इंचX48 इंच (4X3) |
| 3. | डिजीटल एल ई डी वॉल | महानगरपालिका जागेवरील | रु. 30/- प्रति महा | रु. 35/- प्रति महा |
| | | खाजगी जागेवरील | रु. 15/- प्रति महा | रु. 25/- प्रति महा |
| 4. | | महानगरपालिका जागेवरील | | |
| | होर्डींग | 1. रोषनाई नसलेले जाहिरात फलक<br>2. रोषनाई असलेले जाहिरात फलक | रु.5/- प्रति महा+जागा भाडे रु.500/- प्रति महा<br>रु.10/- प्रति महा+जागा भाडे रु.1000/- प्रति महा | प्रति फुट 5/- रु प्रति महा जागा भाडे+ प्रति चौं.फुट 1.56 जाहिरात कर प्रति महा<br>प्रति फुट 5/- रु प्रति महा जागा भाडे+ प्रति चौं.फुट 1.88 जाहिरात कर प्रति महा |
| | | खाजगी जागेवरील / ईमारतीवरील - | | |
| | | 1. रोषनाई नसलेले जाहिरात फलक<br>2. रोषनाई असलेले जाहिरात फलक | रु. 5/- प्रति महा<br>रु. 10/- प्रति महा | प्रति चौं.फुट 1.56 प्रति महा<br>प्रति चौं.फुट 1.88 प्रति महा |

| | | | |
|---|---|---|---|
| 5. | गॅंट्री (मुख्य रस्त्यावरील लोखंडी प्रवेशव्दार) | रु. 15/- प्रति महा | रु. 15/- प्रति महा |
| 6. | दुकानावरील जाहिरातीचे फलक<br>1. रोषनाई नसलेले जाहिरात फलक<br>2. रोषनाई असलेले जाहिरात फलक | रु. 5/- प्रति महा<br><br>रु. 10/- प्रति महा | प्रति चौ.फुट 1.25 प्रति महा<br>20 फुटापेक्षा जास्त असेल तर 10 फुटापर्यंत 1.88<br>प्रति चौ.फुट 2.19 प्रति महा<br>20 फुटापेक्षा जास्त असेल तर 10 फुटापर्यंत 3.13 |
| 7. | रोड शो-<br>1. फिरते वाहन<br>2. फिरते ॲटो / सायकल रिक्षा<br>3. आकाशातील प्रदर्शन (बलुन) | रु. 500/- प्रति दिवस<br>रु. 300/- प्रति दिवस<br><br>रु. 300/- प्रति दिवस | रु. 500/- प्रति दिवस<br>रु. 50/- प्रति दिवस<br><br>रु. 300/- प्रति दिवस |

(ॲड. दिपक उमाकांत मठपती)
सभापती, स्थायी समिती
लातूर शहर महानगरपालिका, लातूर